05 MAR 2022
जनसंपर्क कक्ष
तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ५८ व्या दीक्षांत सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाच्या मुख्य इमारतीस केलेली आकर्षक विद्युत रोषणाई. (छाया : इम्रान गवंडी)


# शिवाजी विद्यापीठाचा आज दीक्षांत समारंभ

- सोहळा होणार ऑनलाईन
- ज्येष्ठ शास्त्रज्ञ दिनकर साळुंके प्रमुख पाहुणे

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचा ५८ वा दीक्षांत सोहळा शनिवार, ५ मार्च रोजी सकाळी १०.३० वाजता ऑनलाईन पध्दतीने होणार आहे. दीक्षांत समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून जीवशास्त्रज्ञ दिनकर साळुंके (मूळ गाव हिंडलगा, बेळगाव) उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी असणार असून उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत प्रमुख उपस्थित राहणार आहेत.

कोरोनाचा संसर्ग टाळण्यासाठी गेल्या दोन वर्षापासून महाविद्यालय व विद्यापीठाचा दीक्षांत सोहळा ऑनलाईन पध्दतीने साजरा केला जात आहे. यंदाच्या दीक्षांत समारंभात ६२ हजार ३६० विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र दिले जाणार आहे. सर्व विद्यार्थ्यांना पोस्टाने घरपोच पदवी प्रमाणपत्रे पाठवली जाणार आहेत. विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात मोजक्याच लोकांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम होईल. विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी पदवीदान समारंभ पेपरलेस केला आहे.



## ◆ डॉ. दिनकर साळुंके यांचा परिचय

डॉ. दिनकर साळुंके हे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे इम्युनॉलॉजिस्ट आणि स्ट्रक्चरल बायोलॉजिस्ट आहेत. डॉ. साळुंके सध्या इंटरनॅशनल सेंटर फॉर जेनेटिक इंजिनिअरिंग अँड बायोटेक्नॉलॉजी, नवी दिल्ली या संस्थेचे संचालक आहेत. डॉ. साळुंके यांचा जन्म १ जुलै १९५५ रोजी बेळगाव येथे झाला. त्यांनी भौतिकशास्त्र, गणित आणि सांख्यिकी या विषयात बीएस्सी केली. धारवाड येथील कर्नाटक विद्यापीठातून भौतिकशास्त्र विषयात फर्स्ट क्लास डिस्टींक्शनसह एमएस्सी (१९७८) पूर्ण केली. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, बेंगळूर येथून त्यांनी मॉलेक्युलर बायोफिजिक्स या विषयात पीएच. डी. (१९८३) पूर्ण केली.

पान ९ पहा

## डॉ. दिनकर साळुंके यांचा परिचय

पान १ वरुन

१९८८ मध्ये डॉ. साळुंके नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ इम्युनोलॉजी, नवी दिल्ली येथे शास्त्रज्ञ म्हणून रुजू झाले. २०१५ पर्यंत ते येथे कार्यरत राहिले. तसेच २०१० ते २०१५ या कालावधीत त्यांनी प्रादेशिक जैवतंत्रज्ञान केंद्राचे अर्थात 'आरसीबी'चे संस्थापक कार्यकारी संचालक म्हणून काम पाहिले आहे. तीन दशकांहून अधिक काळ त्यांनी इम्युन रिकग्निशन, मॉलेक्युलर मिमिक्री आणि ॲलर्जीचे संरचनात्मक जीवशास्त्र समाविष्ट असलेल्या इम्युनॉलॉजीच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर संशोधनकार्य केले आहे. या विषयांवर त्यांचे १३० हून अधिक शोधनिबंध प्रकाशित आहेत.

डॉ. दिनकर साळुंके अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांचे मानकरी आहेत. यामध्ये राष्ट्रीय बायोसायन्स पुरस्कार (१९९९), शांतिस्वरुप भटनागर पारितोषिक (२०००), रॅनबॅक्सी संशोधन पुरस्कार (२००२), जे. सी. बोस राष्ट्रीय फेलोशिप (२००७) आणि जी. एन. रामचंद्रन सुवर्णपदक (२०१०) यांचा समावेश आहे. भारतातील प्रमुख तीनही विज्ञान अकादमींचे ते निर्वाचित फेलो आहेत. (यात इंडियन ॲकॅडमी ऑफ सायन्सेस, बेंगळूर, इंडियन नॅशनल सायन्स अकादमी, नवी दिल्ली, भारतीय राष्ट्रीय विज्ञान अकादमी, अलाहाबाद यांचा समावेश आहे.) त्याचप्रमाणे द वर्ल्ड ॲकॅडमी ऑफ सायन्सेसचेही ते फेलो आहेत.

05 MAR 2022

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



दक्षिण महाराष्ट्राचे उच्च शिक्षणाचे केंद्र असणाऱ्या शिवाजी विद्यापीठाचा ५८ वा दीक्षांत समारंभच्या पूर्वसंध्येला शनिवारी विद्यापीठाच्या मुख्य इमारतीला आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली.

# विद्यापीठाचा आज दीक्षांत समारंभ

## प्रमुख पाहुण्यांची ऑनलाइन उपस्थिती : ६२ हजार ३६० पदवीधारक

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सलग दुसऱ्या वर्षी शिवाजी विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ ऑनलाइन होणार आहे. यंदाचा ५८ वा दीक्षांत समारंभ सव्वा तासामध्ये आटोपण्याचा निर्णय विद्यापीठ प्रशासनाने घेतला आहे.

राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, इंटरनॅशनल सेंटर फॉर जेनेटीक इंजिनिअरींग ॲण्ड बायोटेक्नॉलॉजीचे संचालक डॉ. दिनकर साळुंखे, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत हे प्रमुख पाहुणे या समारंभात ऑनलाइन सहभागी होणार आहेत.

यावेळी कोणतेही पदवी अथवा पारितोषिकाचे प्रत्यक्षात वितरण होणार नाही. विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र पोस्टाने पाठविण्यात येणार आहे. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात दीक्षांत समारंभ होईल. त्याची सुरुवात सकाळी पावणेअकरा वाजता दीक्षांत मिरवणुकीने होणार आहे.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी अहवाल वाचन केल्यानंतर प्रमुख पाहुणे मार्गदर्शन करणार आहेत. पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे, राष्ट्रपती व कुलपती सुवर्णपदक, पीएचडी पदवीप्राप्त विद्यार्थ्यांची घोषणा परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी गजानन पळसे करणार आहेत.

दरम्यान, या समारंभाची निमंत्रण पत्रिका विविध क्षेत्रातील मान्यवरांना ई-मेलद्वारे पाठविली आहे. समारंभात ऑनलाइन सहभागी होण्याचे आवाहन प्रभारी कुलसचिव डॉ. व्हीं. एन. शिंदे यांनी केले आहे.

### यंदा पदवी घेणाऱ्या मुलांची संख्या घटली

यंदाच्या दीक्षांत समारंभात एकूण ६२३६० विद्यार्थी पदवी घेणार आहेत. त्यामध्ये मुलांची संख्या २९८४० आहे. त्यांची संख्या २६८० इतकी कमी झाली आहे. अभ्यासक्रमनिहाय पदवी घेणाऱ्या मुलांची संख्या एम. ए. (२७७), बीएड (२०२), एम. कॉम (५५६), बी. एस्सी (६७७२), बी. कॉम (५४००), एम. एस्सी (७५१) अशी आहे. केवळ बी. ए. अभ्यासक्रमात त्यांची संख्या ११५ आहे.

0 5 MAR 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ५८ व्या दीक्षान्त सोहळ्याच्या पूर्वसंध्येला इमारतीला केलेली आकर्षक रोषणाई.

# शिवाजी विद्यापीठाचा आज दीक्षान्त सोहळा

**कोल्हापूर, ता. ४ :** शिवाजी विद्यापीठाचा ५८ वा दीक्षान्त सोहळा उद्या (ता. ५) ऑनलाईन होत आहे. राजर्षी शाहू सभागृहात सकाळी अकराला त्यास सुरुवात होईल. राज्यपाल भगतसिंग कोश्यारी, इंटरनॅशनल सेंटर फॉर जेनेटिक इंजिनियरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजीचे संचालक डॉ. दिनकर साळुंखे, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत उपस्थित राहतील. निमंत्रितांनी कार्यक्रमस्थळी प्रत्यक्ष उपस्थित न राहता विद्यापीठाच्या 'शिव-वार्ता' (https://www.youtube.com/c/ShivVarta) या यूट्यूब वाहिनीवरून सोहळ्यात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

**पथकाची कारवाई**

विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षेत १५७ विद्यार्थी संशयास्पदरित्या हालचाल करताना विशेष पथकास आढळून आले.

0 5 MAR 2022

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचा आज दीक्षान्त समारंभ

## ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. दिनकर साळुंके, राज्यपाल कोश्यारी, मंत्री उदय सामंत यांची प्रमुख उपस्थिती

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विद्यापीठाचा ५८ वा दीक्षान्त समारंभ शनिवारी (दि. ५) सकाळी ११ वाजता ऑनलाईन पद्धतीने राजर्षी शाहू सभागृह (सिनेट हॉल) येथे राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. दिनकर एम. साळुंके प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत विशेष अतिथी असतील.

समारंभात ६२ हजार ३६० स्नातकांना पदवी प्रदान करण्यात येणार आहे. सर्व पदवी प्रमाणपत्रे विद्यार्थ्यांना पोस्टाने पाठविली जाणार आहेत. आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांची संख्या १९ असून त्यात दोन पीएच.डी.धारक स्नातकांचा समावेश आहे. विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या ११६ पारितोषिकांबाबत स्वतंत्र निर्णय घेतला जाणार आहे. यावर्षी महाविद्यालयीन स्तरावरील पदवी प्रदान समारंभ होणार नाही. विद्यापीठाच्या 'शिव-वार्ता' (https://www.youtube.com/c/ShivVarta) या युट्यूब वाहिनीवरून थेट प्रसारण केले जाईल. याप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांच्यासह सर्व विद्या शाखांचे अधिष्ठाता उपस्थित राहणार आहेत.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ५८ व्या दीक्षान्त समारंभानिमित्त मुख्य प्रशासकीय इमारतीस केलेली आकर्षक विद्युत रोषणाई. (छाया : पप्पू अत्तार)**

पुढारी

# शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय महिला क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ येथील क्रीडा महर्षी मेघनाथ नागेशकर क्रीडा संकुल येथे विवेकानंद कॉलेज आयोजित शिवाजी विद्यापीठ अंतर्गत आंतर विभागीय महिला क्रिकेट स्पधेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे हस्ते झाले.

विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार अध्यक्षस्थानी होते. यावेळी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, डॉ. पी. टी. गायकवाड, डॉ. आय. एच. मुल्ला, श्रीदेवी हिरगुडे उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. किरण पाटील यांनी केले. सूत्रसंचलन प्रा. विजय रोकडे यांनी केले. प्रा. संतोष कुंडले यांनी आभार मानले. स्पर्धेत सांगली, सातारा, कोल्हापूर जिल्ह्यांतून नऊ महिला संघ सहभागी झाले होते. स्पर्धेतून शिवाजी विद्यापीठाचा महिला क्रिकेट संघ निवडण्यात येणार आहे.

जनसंपर्क कक्ष
05 MAR 2022 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



# शिवाजी विद्यापीठ उजळले !

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा ५८ वा दीक्षांत समारंभ शनिवारी होणार आहे. या दीक्षांत समारंभानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीस केलेली आकर्षक विद्युत रोषणाई.

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठाचा आज दीक्षांत समारंभ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाचा ५८ वा दीक्षांत समारंभ शनिवार, दि. ५ मार्च रोजी सकाळी ११ वाजता ऑनलाईन पद्धतीने आयोजित करण्यात आला आहे. राज्याचे राज्यपाल तथा कुलपती भगतसिंह कोश्यारी यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या समारंभास उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत विशेष अतिथी म्हणून, तर ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. दिनकर एम. साळुंके प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात सकाळी ११ वाजता होणाऱ्या या समारंभास कुलगुरू, प्र-कुलगुरूंसह वरिष्ठ अधिकारी व सर्व अधिष्ठाता प्रत्यक्ष, तर मान्यवर अतिथी ऑनलाईन पद्धतीने उपस्थित राहणार आहेत. विद्यापीठाच्या 'शिव-वार्ता' या यूट्यूब वाहिनीवरून थेट प्रसारण करण्यात येणार आहे. या समारंभात एकूण ६२ हजार ३६० स्नातकांना पदवी प्रदान करण्यात येईल. या वर्षी महाविद्यालयीन स्तरावरील पदवी प्रदान समारंभ होणार नसून, याच मध्यवर्ती दीक्षांत समारंभाच्या माध्यमातून सर्व स्नातकांना पोस्टाद्वारे पदवी प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात येणार आहे.

विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागात द्वितीय वर्षात शिकणाऱ्या ऐश्वर्या आकाराम मोरे (मु.पो. वडरगे, ता. गडहिंग्लज) या विद्यार्थिनीस शिवाजी विद्यापीठाचे राष्ट्रपती सुवर्णपदक जाहीर करण्यात आले. त्याचप्रमाणे एम. ए. (हिंदी) परीक्षेत सर्वाधिक गुण मिळवल्याबद्दल सांगली येथील कस्तुरबाई वालचंद महाविद्यालयाच्या स्वाती गुंडू पाटील (मु. पो. दानोळी, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर) या विद्यार्थिनीस कुलपती सुवर्णपदक जाहीर करण्यात आले आहे.

पुण्यनगरी

# महिला क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

क्रीडा महर्षी मेघनाथ नागेशकर क्रीडा संकुल, शिवाजी विद्यापीठ येथे विवेकानंद कॉलेज आयोजित अंतर्गत आंतर विभागीय महिला क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार होते. विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, डॉ. पी. टी.गायकवाड, डॉ. आय. एच. मुल्ला, श्रीदेवी हिरगुडे, प्रा. सूचय खोपडे उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. किरण पाटील, जिमखाना विभाग प्रमुख यांनी केले.

तरूण भारत

# जिद्द, चिकाटीने 'राष्ट्रपती सुवर्ण' पदकाला ऐश्वर्याची गवसणी

## वडरगेच्या ऐश्वर्या मोरे हिचे लखलखीत यश

**रोहित ताशिलदार**
गडहिंग्लज

देशसेवा आणि सामाजिक परिस्थितीचे संस्कार लहानपणापासून होताना खेड्यातील मुलीने जिद्द, चिकाटी आणि प्रामाणिकपणातून अखंड परिश्रमाचा वारसा चालवला. याच दुर्दम्य इच्छाशक्तीबरोबर मेहनतीच्या जोरावर शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रपती सुवर्णपदकाला गवसणी घालणाऱ्या ऐश्वर्या मोरे हिचे आभाळाएवढे कौतुक होत आहे.

शिवाजी विद्यापीठाचा ५८ वा दीक्षांत समारंभ आज शनिवारी ऑनलाईन होत असून जीवशास्त्रज्ञ डॉ. दिनकर साळुंखे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या पार्श्वभूमीवर रसायनशास्त्र पदव्युत्तर दुसऱ्या वर्षात शिकत असलेली राष्ट्रपती सुवर्णपदक विजेती ऐश्वर्या मोरे हिच्याशी संवाद साधला असताना तिने आपली भूमिका मांडली. वडरगेतील ऐश्वर्याचे प्राथमिक शिक्षण छत्रपती शिवाजी विद्यालयात झाले. वडील अक्काराम नुकतेच देशसेवेतून निवृत्त झाले. आई सविता या गृहिणी आहेत. वि. दि. शिंदे हायस्कूलमध्ये माध्यमिक शिक्षणात घेत असताना सामाजिक संशोधन, शिस्त समोर ठेवत तिने वाटचाल सुरू ठेवली. पुढील शिक्षणासाठी स्वामी विवेकानंद कॉलेजमध्ये शिक्षणाला सुरूवात केली. कोल्हापुरातच कलाकौशल्य, स्पर्धा, एनएसएस, एससीसी शिबिरात सहभागी होत सामाजिक कार्यात सहभाग घेतला. पदव्युत्तर शिक्षणासाठी विद्यापीठातील शिक्षणाची सुरूवात विज्ञान शाखेतूनच होत असल्याने संशोधन, कला आणि स्पर्धात्मक युगाची ओळख होत गेली आणि इथेच 'राष्ट्रपती सुवर्ण' पदकाची स्वप्ने पडू लागली.



आई-वडील आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे सर्वच गोष्टीचा समतोल राखणे सोपे झाल्याचे ऐश्वर्या सांगते. विविध स्पर्धेत मिळवलेले रोख रक्कम आणि शिष्यवृत्तीचे मिळालेले पैसे अपंग आणि मतिमंद मुलांच्या सेवेसाठी खर्च करून सामाजिक बांधिलकीही जोपासल्याचे तिने सांगितले. शिवाजी विद्यापीठातील युवामहोत्सव, अविष्कार, उमेदसह एनएसएसमधील राष्ट्रीय शिबिरात सहभागी होऊन शहीद विजय साळसकर गुणवंत विद्यार्थीनीचा किताब पटकावला. झारखंड आणि पाँडेचरी येथे झालेल्या युवामहोत्सावात उल्लेखनीय काम करत आपली ओळख निर्माण केली. कोल्हापूर महानगरपालिका स्वच्छता उपक्रमातील सहभागाने राज्यस्तरीय, राष्ट्रीय सेवा उत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्कार आणि आता शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रपती सुवर्णपदकाने ऐश्वर्याच्या कार्याला आणखी झळाली मिळाली.

तरुण भारत

# डॉ. ककडे यांची आर्थिक साक्षरता विषयावर आकाशवाणीमध्ये मुलाखत

मुंबई : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'दिलखुलास' कार्यक्रमात माजी प्राचार्य, आर्थिक साक्षरता आणि गुंतवणूक विषयावरचे तज्ज्ञ डॉ. व्ही. बी. ककडे यांची विशेष मुलाखत प्रसारित होणार आहे. ही मुलाखत राज्यातील आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवरून व न्यूज ऑन एआयआर



मोबाईल ॲपवर शनिवार ५ मार्च व सोमवार ७ मार्च २०२२ रोजी सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत प्रसारित होईल. वरिष्ठ सहायक संचालक देवेंद्र पाटील यांनी मुलाखत घेतली आहे. 'आर्थिक साक्षरता आज काळाची गरज' आहे. त्यामुळे आर्थिक साक्षरता म्हणजे काय, आर्थिक साक्षरतेची गरज, नागरिकांची होणारी फसवणूक, ऑनलाईन व्यवहार करताना घ्यायची काळजी, फसवणूक झाली तर काय करायचे, तक्रार कुठे नोंदवायची आदी विषयांची माहिती डॉ. ककडे यांनी कार्यक्रमातून दिली.